# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 04 November 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०४ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्याचे निवडणूक आयोगाचे निर्देश.
- विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली, बोरिवली मतदारसंघातून भाजप नेते गोपाळ शेट्टी यांची माघार, तर माहिम मधून शिवसेनेचे सदा सरवणकर निवडणूक लढवण्यावर ठाम.
- मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांची विधानसभा निवडणुकीतून माघार.
- निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राज्यात ११ सभा.

आणि

- जालन्यातल्या आदिती को–ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीमधल्या ३१ लाख रुपयांच्या चोरी प्रकरणात बँकेच्या रोखपालासह लिपीक आणि शिपायास अटक.

****

निवडणूक आयोगानं राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्याचे निर्देश दिले आहेत. रश्मी शुक्ला यांच्याकडील पदभार त्यांच्या नंतरच्या ज्येष्ठता क्रमवारीतल्या पोलीस अधिकाऱ्याकडे सोपवण्याचे निर्देश आयोगानं मुख्य सचिवांना दिले आहेत. त्यानुसार, विवेक फणसाळकर यांच्याकडे पोलीस महासंचालकपदाचा पदभार सोपवण्यात आला आहे. तसंच तीन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची नावं निवडणूक आयोगास उद्यापर्यंत पाठवण्यास सांगितलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपली. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये थेट लढत होत असून, दोन्ही आघाड्यांकडून बंडखोरी रोखण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.
बोरिवली विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणारे भाजप नेते आणि माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. बोरीवलीत भाजपने संजय उपाध्याय यांना उमेदवारी घोषित केल्यानंतर गोपाळ शेट्टी यांनी बंड करत अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला होता.
माहिम विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचे उमेदवार सदा सरवणकर यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. समाज माध्यमावरच्या संदेशात त्यांनी, महायुतीचा पाठिंबा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली.

****

औरंगाबाद मध्य विधानसभा मतदारसंघात छाननीनंतर वैध ठरलेल्या ३५ उमेदवारांपैकी ११ उमेदवारांनी आज अर्ज मागे घेतले. या मतदारसंघात आता २४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. औरंगाबाद पश्चिम मतदारसंघातून दहा जणांनी माघार घेतली असून, १८ उमेदवार रिंगणात आहेत. औरंगाबाद पूर्व मतदारसंघात ४० जणांनी माघार घेतली असून, २९ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.
फुलंब्री मतदारसंघात वैध ८८ उमेदवारांपैकी ३८ जणांनी अर्ज मागे घेतले असून, आता २७ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. सिल्लोड – सोयगाव मतदार संघात ११ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहे.
पैठण विधानसभा मतदार संघात ५१ उमेदवारांपैकी ३४ उमेदवारांनी माघार घेतली असून १७ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. गंगापूर विधानसभा मतदारसंघात ४५ उमेदवारांपैकी २७ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून, आता या मतदार संघात १८ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.

****

नांदेड जिल्ह्यात २९४ उमेदवारांनी माघार घेतली असून, आता निवडणुकीच्या रिंगणात १६५ उमेदवार राहिले आहेत. यामध्ये सर्वाधिक ३३ उमेदवार नांदेड उत्तर मतदारसंघात आहेत. त्या खालोखाल २५ उमेदवार भोकर मतदारसंघात आहेत. किनवट मतदार संघात १७, हदगाव २४, नांदेड दक्षिण २०, लोहा १४, नायगाव

१०, देगलूर ११, आणि मुखेड विधानसभा मतदारसंघात ११ उमेदवार रिंगणात आहेत.

****

परभणी मतदार संघात आज २२ उमेदवारांनी माघार घेतली आहे. जिल्ह्यात ४६ उमेदवारांनी ५९ उमेदवारी अर्ज दाखल केले होते त्यापैकी ३७ अर्ज वैध होते. माघार घेतलेल्या उमेदवारांमध्ये बहुजन समाज पार्टीचे किशनराव खरात आणि डॉ. गोवर्धन भिवाजी खंडागळे, अपक्ष उमेदवार डॉ. सुप्रिया पाटील, विजय वरपुडकर, अनिता सोनकांबळे यांच्यासह १७ उमेदवारांचा समावेश आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या बदनापूर मतदार संघात २० उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले असून, १७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. घनसावंगी मतदार संघात भाजपाचे बंडखोर सतीश घाटगे यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. या मतदार संघात एकूण २३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. जालना विधानसभा मतदारसंघात भाजपाचे जालना विधानसभा प्रभारी भास्कर दानवे यांच्यासह २४ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले.

****

बीड जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदारसंघात ३७७ उमेदवारांपैकी २३८ उमेदवारांनी माघार घेतली असून, आता १३९ उमेदवार रिंगणात कायम आहेत. यामध्ये गेवराई मधून २१, माजलगाव – ३४, बीड – ३१, आष्टी – १७, केज – २५, तर परळी मतदारसंघात ११ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.

लातूर जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदारसंघात ८७ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून, आता १०६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

****

नाशिक जिल्ह्यातल्या १५ विधानसभा मतदारसंघात एकूण ३३७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते, त्यापैकी १३७ उमेदवारांनी आज माघार घेतल्यामुळे, एकूण २०० उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. नांदगाव– मनमाड मतदारसंघात शिवसेनेचे आमदार सुहास कांदे यांच्या विरोधात माजी खासदार समीर भुजबळ यांची अपक्ष उमेदवारी कायम आहे. इगतपुरी– त्रंबक मतदारसंघात शिवसेनेच्या बंडखोर निर्मला गावित यांचीही उमेदवारी कायम आहे.

****

राज्यातली तिसरी आघाडी परिवर्तन महाशक्तीने आज १२१ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. माजी खासदार छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू, राजू शेट्टी, वामनराव चटप, धनंजय जाधव यांनी आज नागपूर इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. आपल्या सर्व उमेदवारांना त्यांनी अर्ज मागे घेण्याचं आवाहन केलं आहे. मित्रपक्षांनी अर्ज पाठवले नसल्यामुळे माघार घेत असल्याचं, त्यांनी आज सकाळी जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठीचा लढा यापुढेही सुरूच राहणार असल्याचं ते म्हणाले.

****

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यात येत्या आठ ते १४ नोव्हेंबर दरम्यान ११ सभा घेणार आहेत. धुळे, नाशिक, अकोला, नांदेड, चंद्रपूर, चिमूर, सोलापूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई आणि मुंबई इथं या सभा होतील, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज नागपूर जिल्ह्यातल्या आठ विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

परभणी जिल्ह्यातल्या रामपुरी इथं दिवाळी पहाट ही सुरेल संगीत मैफल घेण्यात आली. यावेळी स्वीप नोडल अधिकारी गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनात मुख्य समन्वयक अरविंद शहाणे आणि प्रफुल्ल शहाणे यांच्या संचाने, नागरिकांना येत्या २० तारखेला मतदान करण्याचं आवाहन केलं.

**बाईट – गणेश शिंदे, अरविंद शहाणे आणि प्रफुल्ल शहाणे**

****

जालना शहरातल्या आदिती को–ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीमधल्या ३१ लाख रुपयांच्या चोरी प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं आज बँकेच्या

रोखपालासह लिपीक आणि शिपायास अटक केली. संशयितांनी यापूर्वी बनावट सोने तारण ठेवल्याचा प्रकार उघडकीस येऊ नये, तसंच कर्जाचे हप्ते भरण्यासाठी संगनमत करून करून बँकेत चोरी केल्याचं तपासात समोर आल्याची माहिती पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी दिली. संशयितांनी चोरलेले रोख नऊ लाख ९३ हजार रुपये आणि आठ लाख ८३ हजारांचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले आहेत.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक अणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी–मार्चमध्ये घेतल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार सहा ते १९ नोव्हेंबर या कालावधीत नियमित शुल्कासह, तर २० ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहे. राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

****

नांदेड जिल्ह्यात भोकर मतदारसंघातल्या उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी येत्या आठ तारखेला होणार आहे. उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात निवडणुकीसाठी केलेल्या खर्चाचा हिशोब तपासणीसाठी सादर करावा, असं भोकर विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी प्रविण मेगशेट्टी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवलं आहे.

****

श्रीक्षेत्र पंढरपूर इथं कार्तिकी एकादशी निमित्त उद्यापासून श्री विठ्ठलाचं दर्शन भाविकांसाठी २४ तास खुलं राहणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. कार्तिकी यात्रा संपेपर्यंत विठ्ठल मंदिर चोवीस तास भाविकांसाठी खुले असणार आहे.

****

नांदेड इथं आज जिल्हा प्रशासन, सप्तरंग सेवाभावी संस्था, लय स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सप्तरंग सांस्कृतिक महोत्सवाचं उद्घाटन झालं. या महोत्सवात पोवाडा, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, लावणी, रांगोळी स्पर्धा, यासारखे कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

****